| Article Date | Headline / Summary | Publication |
| --- | --- | --- |
| 01 Dec 2025 | Outpatient insurance plan will save you money in winter | Kesari |

# बाह्यरुग्ण विभाग विमा योजनेमुळे हिवाळ्यात तुमचे पैसे वाचतील

शरद ऋतूपासून हवामान बदलत जाते. त्यामुळे हिवाळ्यात बरेच नागरिक आजारी पडतात, हे लक्षात घेऊन आणखी संरक्षणासाठी व्यापक आरोग्य विमा किंवा बाह्यरुग्ण विभाग विमा योजना घेऊन अतिरिक्त विमा कवच तुम्ही या हिवाळ्यात प्राप्त करू शकता. या काळात खोकला, सर्दी आणि ताप असे आजार बळावतात. मात्र उपचारासाठी रुग्णालयात दाखल व्हायची गरज नसते. डॉक्टरांच्या सल्लयानी आणि त्यांनी लिहून दिलेल्या औषधांनी सहजपणे उपचार केले जाऊ शकतात. आरोग्य विमा पॉलिसीमध्ये बाह्यरुग्ण कवच हे अतिरिक्त म्हणून निवडले जाऊ शकते. किंवा ते आधीच सर्वकष आरोग्य विमा पॉलिसीचा भाग असू शकते. रुग्णालयाबाहेरील वैद्यकीय खर्च त्या मधून प्राप्त करून घेता येतो. प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीसाठी बाह्यरुग्ण कवच महत्त्वाचे आहे. तो खिशाबाहेरील खर्च कमी करण्यासाठी आणि रोगांचे लवकर निदान करण्यासाठी तुमच्या आरोग्य विमा पॉलिसीचा भाग असणे आवश्यक आहे.



**भास्कर नेरुरकर**
प्रमुख आरोग्य प्रशासन पथक, बजाज जनरल इन्शुरन्स लिमिटेड (पूर्वीची बजाज अलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी)

## बाह्यरुग्ण योजना म्हणजे काय? आणि ती पैसे कशी वाचवते

बाह्यरुग्ण योजनेत डॉक्टरांचा सल्ला, निदान चाचण्या, औषधांचा खर्च, किरकोळ शस्त्रक्रिया, रुग्णालयात दाखल करण्याची आवश्यकता नसलेल्या उपचारांचा खर्च आणि अगदी फिजिओथेरपीचा समावेश असतो. काही फायदे कॅशलेस असू शकतात; परंतु तुमच्याकडे खर्चाची परतफेड करण्याचा पर्याय देखील असेल, रुग्णालयाचे जाळे, निदान केंद्रे, फार्मसी आणि रुग्णालयांमध्येच कॅशलेस सुविधा मिळू शकतात. बाह्यरुग्ण योजना निवडण्यापूर्वी त्याच्या वाट पाहण्याच्या कालावधीची माहिती असणे आवश्यक आहे. विविध विमा कंपन्यांचे वाट पाहण्याचे कालावधी वेगळे असतात. तुम्हाला उप-मर्यादांची चांगली माहिती व्हावी, यासाठी तुम्ही पॉलिसी काळजीपूर्वक वाचली पाहिजे. तुम्ही आरोग्य विम्यातील बाह्यरूग्ण विमा कवचाद्वारे पैसे विविध माध्यमातून वाचवू शकता. त्याचे काही मार्गही आहेत

## लवकर तपासणी

नियमित तपासणी आणि तपासणीला प्रतिबंधात्मक आरोग्य कवच प्रोत्साहन देते. त्यामुळे सुरुवातीच्या टप्प्यात कोणताही आजार ओळखता येतो. रक्तदाब नियंत्रणात राहतो याची खात्री करण्यापासून ते मधुमेह आणि कर्करोगासारख्या आजारांवर लक्ष ठेवता येईल. लवकर निदान करण्यास मदत करतो, ज्यामुळे चांगले परिणाम मिळण्याची शक्यता वाढते.

## खिशाबाहेरील खर्च वाचेल

नॅशनल हेल्थ अकाउंट्सनुसार, जरी भारताने उच्च सरकारी खर्च आणि विस्तारित विमा कवच यामुळे खिशाबाहेरील खर्च हा ६४ टक्के (२०१३-१४) वरून ३९ टक्के (२०२१-२२) पर्यंत लक्षणीयरीत्या कमी झाला आहे; पण हे प्रमाण पर्याप्त नाही. त्यामध्ये आणखी कपात करण्याची गरज आहे.योग्य दिशेने पुढील पावले टाकणे गरजेचे आहे. आरोग्य विम्यात अतिरिक्त म्हणून बाह्यरुग्ण विभागाचा समावेश करता येईल. याद्वारे तुम्ही डॉक्टरांवर, निदानांवर आणि औषधांवर करत असलेल्या खर्चापासून वाचाल. तुमची विमा कंपनी तो खर्च उचलणार आहे.

## निदान चाचणीचे कवच

रक्त चाचण्या, एक्स-रे आणि एमआरआय सारख्या निदान चाचण्यांसाठी मोठ्या प्रमाणात पैसे खर्च होतात. मात्र डॉक्टर यांनी केलेल्या शिफारशीनुसार बाह्यरुग्ण योजनेचे फायदे मिळतात.

## औषधांच्या खर्चाचे कवच

भारतात, ब्रँडेड औषधे ही जेनेरिक औषधांपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त महाग असू शकतात, विशेषतः त्यामध्ये हृदय, श्वसन आणि मधुमेह यांचा समावेश होतो. ते स्वतःच्या खिशातून दिले तर ते आर्थिक भार ठरू शकते जर तुमचा आरोग्य विमा बाह्यरुग्ण कवच देत असेल तर त्यात डॉक्टरांनी लिहून दिलेले औषधोपचार खर्च समाविष्ट केले जाऊ शकतात. तथापि, हे लक्षात घेतले पाहिजे की ओव्हर-द-काउंटर औषधे लिहून दिली असली तर त्याचे पैसे मिळणार नाही.

## ज्येष्ठ नागरिकांसाठी फायदेशीर

मधुमेह, उच्च रक्तदाब इत्यादी दीर्घकालीन आजारावर बाह्यरुग्ण योजना फायदेशीर आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी हे विशेषतः फायदेशीर आहे, कारण वाढत्या वयात त्यांना त्यांच्या आरोग्यासाठी विशेष काळजी आणि सतत देखरेखीची आवश्यकता असते.

## प्राप्तिकराचे लाभ

बाह्यरुग्ण विमा कवच योजना अतिरिक्त म्हणून ठेवल्याने अतिरिक्त प्रीमियम मिळतात. परंतु फायदे तोट्यापेक्षा खूपच जास्त आहेत. आरोग्य प्रीमीयमवर कर सूट आहे आणि करदाते जुन्या व्यवस्थेत कलम ८० डी अंतर्गत दावा करून फायदा मिळवू शकतात.

निष्कर्ष विविध प्रकारच्या वैद्यकीय खर्चापासून व्यापक संरक्षण करण्यासाठी बाह्यरुग्ण योजना हा एक प्रकारचा उपायचा थांबा आहे. औषधांच्या बिलांपासून ते प्रतिबंधात्मक आरोग्याचे लाभ घेण्यासाठी बाह्यरुग्ण योजना कवच उपयुक्त आहे. आरोग्याचे आणि कल्याणाचे निरीक्षण करू इच्छिणाऱ्या नागरिकांसाठी सुरक्षेचे जाळे प्रदान करतात. शिवाय, खिशाबाहेरील खर्च कमी करण्यास उपयुक्त आहे. एखाद्या व्यक्तीला नियमित तपासणीसाठी मोठा खर्च होतो. तो आर्थिक भार देखील कमी होती.